नं.नपा.वशी. 646/2022
नगरपरिषद कार्यालय,विटा
दिनांक – 06/06/2022

याव्दारे कळविणेत येते की , नगरपरिषदेची विशेष सभा/ प्रशासकिय सभा दिनांक– 14/06/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता , समिती कक्ष येथे आयोजित केली आहे. सदर सभेपुढील विषयांची यादी खाली दिली आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे .

सही/-
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

विषय

1) नगरपरिषदेचे सन 2019-2020 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा, सांगली यांचेकडून दिनांक 20/04/2022 रोजी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला आहे. त्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.
2) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत विटा नगपरिषद हद्दीमध्ये भुयारी गटर योजनेच्या अंदाजपत्रकाचे फेरबदलास प्रशासकीय मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.
3) रि.स.नं.304 अ/1/6/2 व रि.स.नं.304अ/1/6/3 सदर दोन्ही व त्याचा सिटी सर्व्हे नं.561 अ/1अ/1 मधील 12 मीटर डी.पी.रोड मध्ये बधीत होणा-या क्षेत्राचे पुर्नमुल्यांकन करणेबाबत.श्री.राजेंद्र तानाजी जाधव व इतर दोन यांचे दाखल अर्जावर विचार करणे.

सही/-
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

प्रत-

1) उपमुख्यधिकारी
2) सभा विभाग
3) आस्थापना विभाग/मिळकत
4) लेखा विभाग
5) कर विभाग

6) बांधकाम विभाग

7) पाणी पुरवठा विभाग

8) नगररचना विभाग

9) आरोग्य विभाग

10) महिला व बालकल्याण विभाग

11) वाहन विभाग

12) विदयुत विभाग

13) संगणक विभाग

14) अतिक्रमण विभाग

15) नागरी सुविधा केंद्र विभाग

16) भांडार विभाग

दिनांक – 14/ 06/ 2022 रोजीचे विशेष/प्रशासक सभेपुढील विषयाबाबत निवेदन

1) नगरपरिषदेचे सन 2019-2020 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा,सांगली यांचेकडून दिनांक 20/04/2022 रोजी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला आहे. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 चे कलम 10(1) प्रमाणे सदरच्या लेखापरिक्षण अहवालास प्रशासक/कौन्सिल सभेची मान्यता घेणेकामी निर्णयास्तव सादर.
2) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत विटा नगपरिषद हद्दीमध्ये भुयारी गटर योजना राबविणेचा प्रकल्प हाती घेतला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.69,61,15,000/- इतके झाले होते. त्यास मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,प्रादेशिक विभाग पुणे यांनी जा. क्र.मु.अ. (पुणे)/ तांशा-3/विटा भुगयो नगरोत्थान/1065 दिनांक12/04/2022 ने तांत्रिक मंजूरी दिलेली होती. परंतू याबाबत शासकीय दरसुचीचे शुध्दीप्रत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांनी दिनांक 06/05/2022 रोजी केले आहे. त्या शुध्दीपत्रकानुसार सदर प्रकल्पाची किंमत रक्कम रूपये 69,74,06,000/- इतकी झालेली आहे.याकामी होणारी फरकाची रक्कम रूपये 12,91,000/- नगरपरिषद फंडातून भरणेस तयार आहे. तसेच 10% हिस्सा नगपरिषद फंडातून/14 व 15 वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातून भरणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देणेबाबत निर्णयास्तव सादर.
3) रि.स.नं.304 अ/1/6/2 व रि.स.नं.304अ/1/6/3 सदर दोन्ही व त्याचा सिटी सर्व्हे नं.561 अ/1अ/1मधील 12 मीटर डी.पी.रोड मध्ये बधीत होणा-या क्षेत्राचे पुर्नमुल्यांकन करणेबाबत.श्री.राजेंद्र तानाजी जाधव व इतर दोन यांनी अर्जाद्वारे विनंती केली आहे. रि.स.नं.304अ/1/6/2 व रि.स.नं.304अ/1/6/3 सदर दोन्ही व त्याचा सिटी सर्व्हे नं.561 अ/1अ/1मधील 12 मीटर डी.पी.रोड मध्ये बाधीत होणा-या 828.00 चौ.मी.क्षेत्राचे झालेले मुल्यांकन रक्कम रूपये 12,42,000/- मान्य नसलेबाबत कळविले आहे. तरी सदरचा प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांचेकडे पुर्नमुल्यांकनासाठी पाठविणेबाबत निर्णयास्तव सादर.

सही/-
मुख्याधिकारी
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 14/06/2022 रोजीची विशेष/प्रशासकिय सभा

विषय नंबर- 1. नगरपरिषदेचे सन 2019-2020 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा, सांगली यांचेकडून दिनांक 20/04/2022 रोजी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला आहे. त्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.

सुचना –

नगरपरिषदेचे सन 2019-2020 या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षा,सांगली यांचेकडून दिनांक 20/04/2022 रोजी लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला आहे. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 चे कलम 10(1) प्रमाणे सदरच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रशासक/कौन्सिल सभा नोंद घेत आहे. सदर लेखापरिक्षण अहवालातील परिछेदांची पुर्तता करणेकामी अनुपालन अहवाल पाठविणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

विषय नंबर- 2. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत विटा नगपरिषद हद्दीमध्ये भुयारी गटर योजनेच्या अंदाजपत्रकाचे फेरबदलास प्रशासकीय मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

सुचना –

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत विटा नगपरिषद हद्दीमध्ये भुयारी गटर योजना राबविणेचा प्रकल्प हाती घेतला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.69,61,15,000/- इतके झाले होते. त्यास मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे,प्रादेशिक विभाग पुणे यांनी जा. क्र.मु.अ. (पुणे)/ तांशा-3/विटा भुगयो नगरोत्थान/1065 दिनांक12/04/2022 ने तांत्रिक मंजूरी दिलेली होती. परंतू याबाबत शासकीय दरसुचीचे शुध्दीप्रत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांनी दिनांक 06/05/2022 रोजी केले आहे. त्या शुध्दीपत्रकानुसार सदर प्रकल्पाची किंमत रक्कम रूपये 69,74,06,000/- इतकी झालेली आहे.याकामी होणारी फरकाची रक्कम रूपये 12,91,000/- नगरपरिषद फंडातून भरणेस तयार आहे. तसेच 10% हिस्सा नगपरिषद फंडातून/14 व 15 वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातून भरणेस व अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देत आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना शासन निर्णय नुसार सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्प मंजूरीकरीता खालील अटी शर्ती मान्य आहेत.

• बंधनकारक सुधारणा

1) प्रकल्प मंजूरीच्या पहिल्या वर्षात नगरपरिषद यांच्या कामकाजाचे पुर्ण संगणकीकरण करणे अनिवार्य राहील. यात प्रामुख्याने ई-गव्हर्नन्स, लेखा,जन्म-मृत्यू नोंद सुधारण्याची 100 टक्के अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
2) उचित उपभोक्ता कर लागू करून किमान 80 टक्के वसूल करणे.
3) नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतूद करणे.
4) स्थानिक स्वराज्य संस्थेने, द्विलेखा नोंद पध्दती सहा महिन्यात पुर्ण करणे.
5) स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या क्षेत्रातील मालमत्ता कराचे पुर्नमुल्यांकन करणे.
6) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम 2000 च्या तरतूदीनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन करणे.
7) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचे क्षेत्रातील मालमत्ता कराची व पाणीपट्टीची वसूली पहिल्या वर्षी किमान 80 टक्के करणे बंधनकारक राहील. त्यापुढील वर्षात सदर वसूली उर्वरित 90 टक्के या प्रमाणात करणे.
8) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या मालकीच्या इमारतीवर पर्जन्यजल संचय करावे.
9) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.
10) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात ऊर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.

वरील प्रमाणे बंधनकारक सुधारणा नगरपरिषद राबविणेस तयार आहे.

- **वैकल्पीक सुधारणा**

1) मलनिस्सारण प्रकल्प हाती घेतलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरी भागातील सांडपाण्याचे पुर्नप्रक्रीया व पुर्नवापर करण्याबाबतच्या घटकांचा समावेश त्यांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये करावा.
2) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या मालकीच्या इमारतीवर पर्जन्यजल संचय करावे.
3) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने नियमीत जललेखापरिक्षण (वॉटर ऑडीट) करणे.

वरीलप्रमाणे वैयक्तिक सुधारणा नगरपरिषद राबवित आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना शासन निर्णय नुसार सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्प मंजूरीकरीता इतर खालील अटी शर्ती मान्य आहेत.

1) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सुधारीत वित्तीय आकृतीबंधाच्या प्रमाणानुसार देय होणारा त्यांचा हिस्सा योजनेसाठी उघडलेले स्वतंत्र खातेमध्ये प्रथम जमा करणे आवश्यक राहील.
2) सदर योजनेच्या मंजूर प्रकल्पाचे शासकीय, निमशासकीय अभियांत्रीकी महाविद्यालयाकडून त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाचे गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे.
3) या योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय नोडल यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्था यांचा द्विपक्षीय सामंजस करार करणे बंधनकराक राहील.
4) मंजूर प्रकल्प पुर्णत्वास गेल्यानंतर सदर योजनेची देखभाल व दुरूस्त करणेची जबाबदारी नागरी स्थानिक संस्थेची राहील.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत शासनाकडील ज्या काही शर्ती व अटीअसतील याचे पालन करणेस नगरपरिषद तयार आहे. याकामी आवश्यक ती पुढील नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 14/06/2022 रोजीची विशेष/प्रशासकिय सभा

विषय नंबर- 3. रि.स.नं.304 अ/1/6/2 व रि.स.नं.304अ/1/6/3 सदर दोन्ही व त्याचा सिटी सर्व्हे नं.561 अ/1अ/1 मधील 12 मीटर डी.पी.रोड मध्ये बधीत होणा-या क्षेत्राचे पुर्नमुल्यांकन करणेबाबत.श्री.राजेंद्र तानाजी जाधव व इतर दोन यांचे दाखल अर्जावर विचार करणे.

सुचना –

विषयांकित प्रकरणी सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांचा अहवाल मागविणेत यावा.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 14/06/2022 रोजीची विशेष/प्रशासकिय सभा

ऐनवेळचा विषय – विषय नंबर 1. UPHC साठी जागा उपलब्ध करून देणे/भाडे तत्वावर चालू करणेबाबत निर्णय घेणे.

सुचना –

मिळकत विभागाकडील अहवालानुसार खानापूर तालुक्यामध्ये विटा नगपरिषद कार्यक्षेत्रात 3 ठिकाणी 1) विवेकानंदनगर कराड रोड, विटा 2) लेंगरे रोड शाळा नं. 2 जवळ, विटा 3) हणमंतनगर बळवंत कॉलेज, विटा UPHC मंजूर झालेले आहेत. सदर ठिकाणी सध्या भाडे तत्वावर जागा व खोल्या उपलब्ध करून देऊन UPHC चालू करावयाची आहे. अथवा UPHC बांधकाम करणेसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावयाची आहे. याबाबत जिल्हास्तरावर निधी उपलब्ध झाले असल्याचे पत्र क्रं.आरोग्य/आस्था/272/2022 दि.18/05/2022 चे तालुका आरोग्य अधिकारी यांचे प्राप्त झाले आहे.वरील पत्राच्या अनुषंगाने UPHC जागेची प्रत्यक्ष पाहणी तालुका आरोग्य अधिकारी यांचे सोबत करणेत आलेली आहे. याप्रमाणे पुढील ठिकाणे सुचविणेत आलेली आहेत.1) विवेकानंदनगर बेघर वसाहत , विटा 2) लेंगरे रोड शाळा नं. 2 3) हणमंतनगर बळवंत कॉलेज जवळील विटा नगरपरिषद शाळा नं.16 याप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात भाडे तत्वावर खोल्या उपलब्ध करून देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा